ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३७ | पुणे, बुधवार, १८ ऑगस्ट, १९७१ | अंक १६

## कसब आहे पण भांडवल नाहीं अशापैकी तुम्हीही एक असूं शकाल.

## आमच्याकडं या आम्हीं तुम्हांला भांडवल देऊं.



आमच्या जवळ योजना आहेत, त्यातल्या पुष्कळशा तुमच्या सारख्याला योग्य आहेत. त्यांतून तुम्ही तुमचा व्यवसाय निवडा, जीवनाचा स्तर उंचवा आणि उन्नतीकडं यशस्वी वाटचाल करा. अधिक व सविस्तर माहितीसाठी आमच्या कोणत्याही शाखेला भेटा.

बँक ऑफ महाराष्ट्र
हेड ऑफीस : ११७७ बुधवार, पुणें २.



715 MAR

## आस्वान धरण हितकारक कां अनर्थकारक ?

इजिप्तमधील आस्वान धरण आता पूर्ण होत आले आहे. सुमारे दोन मैलांपेक्षा जास्त लांब, ३०० फूट उंच आणि बुडाशी ३,००० फूट रुंद असे हे धरण बांधण्यास रशियाची मदत मुख्यत: उपयोगी पडली आहे. वीज उत्पादन करणारी शेवटची दोन टरबाइन्स बसवून पुरी झाली म्हणजे त्यांची एकूण संख्या १२ होईल.

धरणात साठवलेल्या पाण्यामुळे इजिप्तमधील १२ लक्ष एकर जमिनीला नव्याने पाणी मिळू शकेल. बांधकाम १० वर्षे चालू आहे. ह्या काळात लोकसंख्येत जी वाढ झाली आहे, तिला खायला घालायलासुद्धा धरणामुळे धान्योत्पादनात होणारी वाढ पुरी पडणार नाही!

धरणाच्या काही संभाव्य दुष्परिणामांची चर्चा आताच सुरू झाली आहे. एक-दोन पिढ्यांनंतरच्या इजिप्शिअन लोकांना वाटू लागेल की, धरण बांधले नसते, तर बरे झाले असते.

इजिप्तच्या वरच्या भागातून खालच्या भागाकडे नाइल नदीतून दरसाल १३ कोटी टन गाळ वाहात येतो, तो धरणामुळे बंद होईल. त्या कारणाने, तेथील शेतकऱ्यांना खते वापरावी लागतील. ही खते निर्माण करण्यासाठी धरणाच्या पाण्यावर चालणारी टरबाइन्स वीज पुरवितील!


नाइल नदीतून वाहात येणारे खाद्य माशांना मिळेनासे झाले म्हणजे मच्छीमारीच्या धंद्यावर परिणाम होईल. हा दुष्परिणाम आताच जाणवू लागला आहे. समुद्रातील खारे पाणी नदीच्या पात्रातून वर येऊ लागले आहे, त्याचा आजूबाजूच्या शेतजमिनीवर दुष्परिणाम होऊ लागला आहे.

धरणामुळे रोग वाढण्याचा संभव आहे, असे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत आहे. पुरेशी खबरदारी घेतली नाही, तर काही नवे रोग पसरतील.

ह्या सर्व भविष्यावर विश्वास न ठेवणेच इजिप्शिअन तज्ज्ञांना भाग आहे. दुष्परिणामापेक्षा सुपरिणाम अनेक पटींनी चांगले होतील, असा त्यांचा अंदाज आहे. "दरसाल वाढणाऱ्या लोकसंख्येचे पोट भरण्यासाठी इजिप्तला ह्याहीपेक्षा मोठ्या धरणांची आवश्यकता आहे. आपण विजेचे उत्पादन वाढविले पाहिजे, जास्त जास्त जमीन लागवडीखाली आणली पाहिजे." असे त्यांचे म्हणणे आहे. आस्वान धरणामुळे इजिप्तच्या अडचणी नष्ट होतात कां नव्याने सुरू होतात, हें भविष्यकाळच ठरवील.

## खोट्या नोटांच्या अफवांचा प्रताप

नेपाळमधील बँकांनी १०० रुपयांच्या भारतीय नोटांच्या बदला करण्याचे बंद केले आहे. उत्तर बिहारमध्ये बऱ्याच खोट्या नोटा व्यवहारात असल्याच्या वार्ता पसरल्या आहेत. बिहारमधील मुझफ्फरपूर, बेटिआ, मोतीहारी, जयनगर आणि पूर्णिआ ह्या शहरांतून अशा बनावट नोटा विशेष प्रचारात असल्याची वार्ता आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांत तर बेचैनी पसरलीच आहे, पण भारत आणि नेपाळ ह्यांच्यामधील व्यापारावरही परिणाम होत आहे.


होय!

आर्थिक बाबींचा प्रश्न उभा राहील तर लघुउद्योग धंद्याचा पुरोगामी चालक नक्की तेंच करील

बँक ऑफ इंडिया

RAAS/B/118 B MAR

☆ अर्थ ☆

बुधवार, १८ ऑगस्ट, १९७१



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## बँकांकडून मिळणाऱ्या सेवांची किंमत

बँका आपल्या खातेदारांना ज्या सोयी-सवलती देतात त्या काही मोफत उपलब्ध होत नाहीत. त्या देण्यासाठी बँकांना खर्च करावा लागतो आणि हा खर्च त्या त्यांच्याकडून कर्जे घेणाऱ्यां-कडून अधिक दराने व्याज घेऊन भागवितात. गेल्या २५ वर्षांत खातेदारांना सोयी-सवलती पुरवण्यासाठी जो सर्व्हिस चार्ज बँका आकारतात त्यात वाढ झालेली नाही. परंतु आता मात्र त्यात वाढ करावी लागणार आहे असे दिसते. कारण राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका चालविणे अधिकाधिक खर्चाचे होऊ लागले आहे. उलटपक्षी, बँकांशी व्यवहार करणाऱ्या लोकांची वृत्ती बदलली आहे. त्यांना आता कामासाठी तासतास थांबत बसण्यास वेळ नसतो. आपले काम झटपट व्हावे अशी त्यांची इच्छा असते. कोणत्याही कामासाठी खोळंबून राहण्याची त्यांची तयारी नसते. सेव्हिंग्ज खात्यातून पैसे काढण्याची 'टेलर' पद्धत बँकांनी सुरू करावी असे अनेक खातेदारांना वाटते. ह्या पद्धतीत काही रकमांच्या आतील चेक त्वरित वटविण्यात येतात. सेव्हिंग्ज खात्यांच्या अभ्या-सात असे आढळून आले आहे की ह्या खात्यातील ठेवीदारांसाठी बँक जितका खर्च करते त्यापेक्षा कमी प्राप्ती बँकेला होत असते. डिमांड ड्राफ्ट अगर मेल ट्रान्सफर ह्या पद्धतीने पैसा पाठविण्या-बद्दल बहुतेक बँका फार अल्प मोबदला घेतात. शेअर्स, युनिट्सचे रोखे, विमा पॉलिसी, इत्यादी सुरक्षित ठेवण्यासाठीही फार कमी पैसे आकरण्यात येतात.

### भारतातील अमेरिकन बँकेचा पुढाकार

ह्या परिस्थितीचा विचार करून एका मोठ्या अमेरिकन बँकेने गिऱ्हाइकांना देण्यात येणाऱ्या सोयीसवलतींची पुनर्घटना करण्याचे ठरविले आहे. ह्या बँकेच्या शाखा दिल्ली, मुंबई, कलकत्ता आणि मद्रास ह्या शहरांत आहेत. बँकेच्या मुंबई शाखेतील सेव्हिंग्ज खात्यांत आता खातेदाराला किमान २५० रुपयांची रक्कम सतत ठेवावी लागेल. चालू खात्यासाठी किमान १ हजार रुपयांची रक्कम सतत ठेवावी लागेल. सेव्हिंग्ज खातेदाराने हा नियम पाळला नाही तर त्याला दर तिमाहीला १० रुपये भरावे लागतील. चालू खातेदाराला अशा नियमभंगाबद्दल दरमहा १० रुपये द्यावे लागतील. एखाद्या खातेदाराने तीन महिन्यांच्या अवधीत १५ पेक्षा अधिक चेक सोडले असतील तर त्यालाही थोडा आकार द्यावा लागेल. एखाद्या खातेदाराने खात्यात पैसे नसताना चेक दिला आणि तो वटविला गेला नाही तर त्याला १० रुपये भुर्दंड पडेल. दुसऱ्या एखाद्या बँकेवरील चेक खातेदाराने भरला आणि तो परत आला तरीही त्याला ५ रुपये द्यावे लागतील. व्यापारधंद्यात गुंतलेल्यांना बँका अनेक प्रकारच्या सोई उपलब्ध करून देतात. त्याबद्दल त्यांना द्यावयास लागणाऱ्या पैशांतही वाढ करण्यात आली आहे. अलीकडे सर्वच बँकांत असणाऱ्या सेव्हिंग्ज खात्यांच्या संख्येत खूप वाढ झालेली आहे. अर्थातच ती चालविण्यात अधिक वेळ जाऊ लागला आहे. ह्या कामासाठी गणकयंत्रांचा वापर करता येईल. पण त्यासाठी मोठा खर्च करावा लागेल; आणि शिवाय बँकांच्या कर्मचारी संघटनांकडूनही त्याला विरोध होईल.

---

### हिंदचा आर्थिक विकास मंदावणार

पूर्व बंगालमधील यादवी युद्ध सुरू झाल्यापासून भारतात निर्वासितांचे लोंढे एकसारखे येत आहेत. त्यांची संख्या आता ७० लाखांवर गेली असून ती एक कोटीच्या घरात जाण्याचीही शक्यता आहे. निर्वासित चारसहा महिन्यांत परतू शकतील अशी सरकारची व लोकांची कल्पना होती. परंतु कोणतीही कालमर्यादा घालणे आता अशक्य होत चालले आहे. पश्चिम जर्मन सरकारच्या अर्थखात्यातील एका अधिकाऱ्याने ह्या परिस्थितीचा आढावा घेऊन असा अभिप्राय व्यक्त केला आहे की निर्वासितांचा योगक्षेम चालविण्याची प्रचंड जबाबदारी भारतावर पडल्याने भारताचा आर्थिक विकास कित्येक वर्षांनी मागे रेंगाळत राहील. भारतावर कोसळलेल्या ह्या आपत्तीचे परिणाम किती गंभीर होतील ह्याची कल्पनाही करता येणार नाही. निर्वासितांना जगविण्यासाठी परदेशांकडून आलेली मदत एकूण गरजेच्या मानाने अत्यल्प आहे. अशा परिस्थितीत भारताने दारिद्र्य दूर करण्याचे जे प्रयत्न चालविले आहेत त्यावर प्रतिकूल परिणाम झाल्याखेरीज राहणार नाही. गरिबी हटाव कार्यक्रमावरील खर्च कमी करून अधिक कर-वाढ करण्याखेरीज दुसरा मार्गच राहणार नाही. अर्थातच गरिबांच्या परिस्थितीत सुधारणा होण्याची आशा नजीकच्या भविष्य-काळात तरी दिसत नाही. त्यातच दुष्काळाचीही भर पडणार आहे.

## स्वातंत्र्यपूर्व काळातील परदेशीय भांडवल गुंतवणूक

भारत सरकारच्या अर्थखात्याने काही परदेशीय भांडवल गुंतवणुकीची पाहणी केली आहे. विशेषत: स्वातंत्र्यपूर्व काळातील अशा गुंतवणुकीकडे लक्ष देण्यात आले. पाहणीत असे आढळून आले की परदेशी गुंतवणूक ग्राहकोपयोगी माल निर्माण करणाऱ्या आणि अधिक नफा असणाऱ्या उद्योगधंद्यांत करण्यात आलेली आहे किंवा व्यापारात तरी करण्यात आलेली आहे. १९४९ नंतर मात्र सरकारने मंजुरी दिलेली परदेशी गुंतवणूक योग्य निवड करून झालेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात झालेल्या भांडवल गुंतवणुकीमुळे व्हावा तसा फायदा झालेला नाही. कारण त्या गुंतवणुकीमुळे परदेशी चलन बाहेर जात होते. भारताच्या अर्थव्यवस्थेवर वाईट परिणाम करणाऱ्या ह्या उद्योगधंद्यांचा सरकारने नावनिशीवार उल्लेख प्रथमच केला आहे. तथापि योग्य ती निवड करून उद्योगधंद्यांत गुंतविण्यात आलेल्या परदेशी भांडवलाचा मात्र देशाला लाभ झालेला आहे. भारताची अर्थव्यवस्था अद्याप पूर्णपणे विकास पावलेली नाही. तेव्हा अर्थव्यवस्थेच्या विकासाला हातभार लावण्यास उपयुक्त होईल अशा मालाच्या उत्पादनाला केव्हाही विशेष महत्त्व आहे. कारण त्यामुळे परदेशाकडून कराव्या लागणाऱ्या आयातीत कपात करणे शक्य होते. शिवाय नव्याने काढण्यात आलेल्या उद्योगधंद्यांमुळे निर्यातीच्या परंपरागत वस्तूंखेरीज नव्या वस्तूंची निर्यात करण्यास मदत होत आहे. नव्या तंत्रज्ञानाची नीट ओळखही त्यांच्यामुळे होत आहे.

---

## हिंदी डॉक्टर्सना स्वदेशात आणण्याचे प्रयत्न

तंत्रज्ञांचा परदेशात जाण्याचा ओढा हा भारतापुढील एक कठीण प्रश्न आहे. अशा तंत्रज्ञांत एंजिनिअर्स, डॉक्टर्स, शास्त्रज्ञ इत्यादींचा भरणा असतो. डॉक्टर्सनी परदेशात जाऊ नये म्हणून काय करावे ह्यासंबंधी भारत सरकार विचार करीत आहे. सरकारने अलीकडेच गोळा केलेल्या आकड्याप्रमाणे ६ हजार हिंदी डॉक्टर्स ब्रिटनमध्ये काम करीत आहेत. त्यांची अमेरिकेतील संख्या सुमारे ४ हजार आहे. डॉक्टर्स लोक परदेशात जातात ते मुख्यत: पैसा मिळवण्यासाठी. परदेशात त्यांना भारतापेक्षा १० ते १५ पटीने अधिक उत्पन्न मिळते. साहजिकच परदेशात जाऊन कमाई करण्याची ओढ त्यांना लागते. ह्या वृत्तीला आळा घालण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य सेवेच्या कायद्यात दुरुस्ती करून ३० वर्षे वयाच्या आतील डॉक्टरांना सरकारी नोकरीची सक्ती करण्याचे घाटत आहे. जितकी वर्षे सक्तीची नोकरी केली असेल तितकी वर्षे त्यांना नियमित नोकरीसाठी जरूर असणाऱ्या वयातून सूट देण्यात येईल. त्याशिवाय डॉक्टरांना राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांमार्फत आर्थिक मदत देणे, ग्रामीण भागात राहणाऱ्या डॉक्टरांना खास प्रलोभने देणे, सेवानिवृत्तीच्या वयात वाढ करणे इत्यादी उपायही योजण्यात येण्याची शक्यता आहे. सध्या ब्रिटनमध्ये जे हिंदी डॉक्टर्स काम करीत आहेत त्यांच्यापैकी ९३ टक्के डॉक्टर्स कनिष्ठ प्रतीच्या जागांवर आहेत आणि तेही दुय्यम दर्जाच्या इस्पितळात. त्यामुळे त्यांच्या वैद्यकीय ज्ञानात भर पडत नाही अगर त्यांना संशोधन करण्यास जमत नाही.

---

## संयुक्त राष्ट्र संघटनेचे निरीक्षक भारतात कशासाठी ?

बांगला देशातील जनतेचा उठाव फारतर एका आडवड्यात चिरडून टाकू ह्या हिशेबाने पश्चिम पाकिस्तानच्या लष्करशहांनी तेथे अमानुष क्रूर कारवाई केली. पण त्याचा परिणाम उलटा होऊन बांगला देशातील जनता चिडून अधिक कार्यक्षमतेने पाकिस्तानी लष्कराशी झुंज देत आहे. त्यामुळे तोल गेल्यासारखे होऊन प्रे. याह्याखान ह्यांनी भारताविरुद्ध युद्ध पुकारण्याचीही भाषा केली. पण त्यांचा हा आक्रमक पवित्रा निराळ्या डावपेचांचा भाग असण्याची शक्यता आहे. बांगला देशातून भारतात आलेल्या निर्वासितांना परत धाडण्यासारखी परिस्थिती निर्माण व्हावी म्हणून तेथे आणि भारतात संयुक्त राष्ट्रसंघटनेचे निरीक्षक असावेत अशी सूचना करण्यात आली होती. ही सूचना मूळ अमेरिकेचीच असून तीमागे एक धूर्त कावा असल्याचा अंदाज आहे. भारतात असे निरीक्षक ठेवल्यास मुक्ती फौजेला मदत करणे अशक्य होणार आहे. शिवाय ह्या प्रकरणात भारत व पाकिस्तान एकाच पातळीवर असल्याचा गर्भित अर्थही त्यातून निघू शकतो. भारत सरकारने भारताच्या भूमीवर निरीक्षक ठेवण्यास सक्त विरोध केला आहे. त्यामुळे पूर्व बंगालची जनता व पाकिस्तानचे सरकार ह्यांच्या दरम्यान उभ्या राहिलेल्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होते; आणि म्हणूनच त्याला त्या प्रश्नाला नवीन अनावश्यक फाटा फोडण्यास भारताचा विरोध आहे. शिवाय निरीक्षकांच्या खर्चाचा प्रश्नही बिकट आहे.

---

## सुवेज कालवा बंद झाल्याने जगातील देशांना ९० अब्ज रुपयांचा भुर्दंड

संयुक्त अरब प्रजासत्ताकाच्या मालकीच्या सुवेज कालव्याचा आंतरराष्ट्रीय व्यवहार १९६७ सालच्या जून महिन्यातील इस्रायली आक्रमणामुळे बंद पडला. त्यामुळे जगातील देशांना केवढा तरी मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागला आहे त्याची आकडेवारी अमेरिकेच्या कोलोराडो विद्यापीठाच्या आफ्रिका आणि मध्यपूर्व विभागाचे अध्यक्ष आणि अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. रागाई अल् मालाख्ख यानी तयार केली आहे. त्यांनी जो ठोकताळा तयार केला आहे त्याप्रमाणे १९६७ पासून तो १९७१ पर्यंत सुवेज कालव्याचा आंतरराष्ट्रीय व्यवहार बंद राहिल्या कारणाने जगातील देशांना १२ अब्ज डॉलर्सचा म्हणजे ९० अब्ज रुपयांचा भुर्दंड भरावा लागला आहे. यामध्ये सर्वांत जास्त आर्थिक बोजा युरोपातील देशांना सहन करावा लागला आहे.

---

### महाराष्ट्रातील कामगार संघ आणि त्यांचे सभासद

| | मध्यवर्ती संघटनेचे नाव | संलग्न कामगार संघांची संख्या | सभासद संख्या (१०००) |
|---|---|---|---|
| १. | हिंद मजदूर सभा (HMS) | २४६ | २०८ (२१.९६) |
| २. | इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (INTUC) | ११० | १७० (१७.९८) |
| ३. | हिंद मजदूर पंचायत (HMP) | १५ | ८७ (९.२२) |
| ४. | भारतीय मजदूर संघ (BMS) | ७२ | ७२ (७.६२) |
| ५. | ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC) | ७४ | ५५ (५.८०) |
| ६. | युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस (UTUC) | ४ | २ (०.२२) |
| ७. | कुणालाही संलग्न नसलेले (NA) | ६०९ | ३०७ (३२.३९) |
| ८. | कुणाला संलग्न माहीत नाही (ANK) | १२७ | ४६ (४.८१) |
| | एकूण | १०५७ | ९४७ (१००.००) |

कंसातील आकडे % चे आहेत.

### हिंदी मुले युरोपात दत्तक घेण्याची चळवळ

हिंदी मुले, मुख्यत: मुली, दत्तक घेण्यासाठी अधिकाधिक पाश्चात्य पालक पुढे येत आहेत. दोन घरची आणि विकसन देशातील दत्तक घेतलेले किमान एक, अशी तीन मुले असावीत, अशी स्वीडनमध्ये चळवळच सुरू झाली आहे. १९६५ ते १९६९ ह्या मुदतीत स्वीडनमधील पालकांनी इंडियन कौन्सिल ऑफ चाइल्ड वेल्फेअरच्या मार्फत ५७ अर्भकांना दत्तक घेतले. ह्याच काळात फ्रेंचांनी २३ अर्भके दत्तक घेतली. संस्थेच्या जनरल सेक्रेटरी डॉ. (मिसेस) श्यामकुमारी खान ह्यांनी नुकतीच ४० देशांना भेट देऊन तेथील दत्तक मुलांची प्रगती पाहून समाधान व्यक्त केले. गार्डिअन्स अ‍ॅन्ड वॉर्डस अ‍ॅक्टखाली परदेशीयांना हिंदी मुले दत्तक घेता येतात.

### डिझेल इंजिनांच्या कारखान्यांना मंदी

डिझेल इंजिने तयार करणाऱ्या कारखान्यांना मंदीला तोंड द्यावे लागत आहे. ४ ते ६ अश्वशक्तीची इंजिने वगळली तर बाकी सर्व इंजिनांचे उत्पादन गेल्या सहा महिन्यात घटले आणि १९६९ च्या दुसऱ्या सहामाहीच्या तुलनेने परिस्थिती अधिकच विकट आहे.

### धोक्याची साखळी ओढण्याचा उपद्रव

रेल्वेच्या डब्यात अत्यंत आणीबाणीच्या वेळी गाडी थांबविता यावी म्हणून धोक्याचा इशारा देणारी साखळी असते. योग्य पद्धतीने वापरण्यासाठी केलेली ही तरतूद तशी वापरली मात्र जात नाही. साखळी ओढण्याच्या प्रसंगाची अलीकडेच एक पाहणी करण्यात आली. त्यावरून असे दिसून आले की रेल्वे अधिकाऱ्यांनी ह्याबाबतीत केलेल्या उपायांना यश लाभले नाही. साखळीच्या उपयोगासंबंधी लोकांना समजावून सांगण्याचा प्रयोग झाला, कडक शिक्षा जाहीर करण्यात आल्या, गुन्हेगारांना पकडण्याच्या कामी मदत देणारांना रोख बक्षिसांची लालूच दाखविण्यात आली आणि अचानक तिकीटतपासणीही झाली. पण हे सर्व वाया गेले. आज हिंदमधील रेल्वेमार्गावर दररोज एक हजार वेळा धोक्याच्या साखळया मामुली कारणासाठी खेचल्या जातात. एखाद्या प्रवाशाला आपल्या खेड्याजवळ अगर घराजवळ अगर कॉलेजजवळ गाडी थांबण्यास पाहिजे असते. बिनातिकीट प्रवास करणारे निसटण्यासाठी साखळीचा उपयोग करतात. काही वेळा चोरटा व्यापार करणारे आणि चोरही साखळीचा फायदा घेतात. ह्या सर्व प्रकरणात एक गोष्ट मात्र उघड दिसून येते. रेल्वे लोकांच्या मालकीची असली तरी तिचा गैरफायदा घेणाऱ्यांना पकडून देण्याच्या कामी लोकांचे सहकार्य मिळत नाही. भीतीपोटी अगर खोट्या सहानुभूतीपोटी लोक गप्प बसतात. रेल्वेच्या सर्व म्हणजे ९ विभागांत साखळी ओढण्याचे गैरप्रकार होत असले तरी ईशान्य रेल्वेचा ह्या बाबतीत पहिला क्रमांक लागतो.

### शरीर झाकण्यास युगांडातील जमातीचा नकार

युगांडामधील प्रमुख १०-१२ जमातींपैकी करामोजाँग ही सुमारे २,८०,००० जणांची जमात सर्वात मागासलेली आहे. त्यांपैकी स्त्रिया थोडेतरी वस्त्र अंगावर घेतात, पण पुरुष पूर्णपणे नग्नावस्थेत वावरतात. युगांडाचे अध्यक्ष जनरल इदि अमिन ह्याने कायदा करून जमातीमधील सर्वांनी शर्ट, विजारी व बूट घालावे अशी सक्ती केली. अमिनचा जाहीरनामा वाचून दाखविणाऱ्या खेड्याच्या प्रमुखांचा आवाज जमातवाल्यांनी आरडा-ओरडा करून बंद पाडला. ज्यांनी कपडे घातले, त्यांना ते काढायला लावले आणि त्याच्या चिंध्या खायला लावल्या. बंडखोरांना कह्यात आणण्यासाठी लष्कराचा उपयोग करावा लागला. आतापर्यंत फक्त १२० जमातवाल्यांनी कपडे घालायला प्रारंभ केला आहे, कारण ते मोरोटो येथे शांतताभंगाबद्दल पकडले जाऊन त्यांना कारावासाची शिक्षा झाली आहे. कैद्यांचे कपडे त्यांना घालावेच लागतात !

### युनायटेड कमर्शिअयल बँक लिक्विडेशन पसंत करणार

यु. क. बँकेने व्हॉलंटरी लिक्विडेशनमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. ५० रु. च्या प्रत्येक शेअरला १३५।१४० रु.भरपाई वाटण्यास येईल। शेअरची बाजारातील किंमत १४ रु. नी वाढून १२४ रु. वर गेली आहे.

## बांगला देशातील अभिनेत्रीला "१४ वर्षांच्या कैदेची शिक्षा"

बांगला देशातील प्रमुख अभिनेत्री कावेरी चौधरी ही आपल्या पतीसमवेत १३ एप्रिल १९७१ रोजी जीव बचावण्यासाठी ढाका शहरातून पहाटे ३·३० वाजता निसटली. "माझी हत्याकांडातून सुटका" हा चित्रपटाचा उत्कृष्ट विषय आहे, असे ती म्हणते. तिला तीस लक्ष रुपयांच्या मालमत्तेवर पाणी सोडून पलायन करावे लागले आहे. त्या वेळी ती २१ बोलपटांत काम करीत होती. त्यांपैकी २ बोलपटांचे दिग्दर्शन तिचे पती करीत होते. ती व तिचे पती सध्या मुंबईत आहेत. आय. एस. जोहरच्या 'जय बांगला देश' या फिल्मच्या शूटिंगमध्ये ती भाग घेत आहे. फिल्मचा काही भाग प्रत्यक्ष बांगला देशात जाऊन चित्रित केला जाईल. "पाकिस्तानच्या सत्तेला विघातक कार्य" केल्याच्या आरोपावरून कावेरीला पाकिस्तानी लष्करी राजवटीने १४ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. तिची मालमत्ताही जप्त करण्यात आलेली आहे. ६ ऑगस्टच्या पाकिस्तानी वार्तापत्रात रेडिओवरून ही माहिती प्रसृत करण्यात आली होती.

---

## गांधीजींनी जिनांना व्हिस्की दिली !

श्री. जे. एन. सहानी यांनी "दि लिड ऑफ" या नावाने एक पुस्तक लिहिले आहे, त्यात गेल्या ५० वर्षांतील प्रमुख भारतीयांची स्मरणचित्रे दिली आहेत. सप्टेंबर १९३१ मध्ये गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी लंडनला गेले होते, त्या वेळच्या एका प्रसंगाचे वर्णन श्री. सहानी यांनी खालीलप्रमाणे केले आहे. "एक दिवस गांधीजींनी जिनांना वाटाघाटीसाठी आपल्या मुक्कामी बोलाविले. "तुम्ही काय घेणार ?" असा त्यांनी जिनांना प्रश्न केला. जिना खोडसाळपणे म्हणाले, "तुम्ही देऊ शकत असाल तर स्कॉच आणि सोडा मला आवडेल." गांधीजींनी स्वतः बाहेर जाऊन सोडा आणि व्हिस्की आणली. "तुम्हीच माझ्या ग्लासात ओतून द्या ना" जिना म्हणाले. गांधीजींना बहुधा मुद्दामच ग्लासात थोडासा सोडा घातला आणि स्कॉच व्हिस्कीची सबंध बाटलीच त्यात रिकामी करू लागले, तशी जिनांनी त्यांचा हात धरून थांबवले आणि दोघेही मनसोक्त हसले ! गांधीजींनी एवढा पाहुणचार केला, पण त्यातून निष्पन्न काहीच झाले नाही."

---

## युनायटेड नेशन्समधील जादू

"दोन राष्ट्रांतील तंटा युनायटेड नेशन्सकडे नेण्यात आला, म्हणजे तीनपैकी कुठलीतरी एक गोष्ट घडते. हा तंटा एक बडे राष्ट्र आणि एक छोटे राष्ट्र ह्यांच्यामध्ये असला तर छोटे राष्ट्र गायब होते. तंटा दोन छोट्या राष्ट्रांत असला तर तंटा गायब होतो. नंतर बड्या राष्ट्रांत असला, तर युनायटेड नेशन्सच गायब होते !" :—दीनदयाळ रिसर्च इन्स्टिट्यूटमधील बांगला देशासंबंधीच्या परिसंवादामध्ये श्री. डी. आर. मणकेकर यांचे भाषण.

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



नाण्याला तीन बाजू असतात

दोन नेहमीच्याच आणि तिसरी बाजू परीघ (कडी) : युनायटेड वेस्टर्न बँकेत रक्कम गुंतविल्याने नाण्याचा परीघ वाढतो म्हणजेच रकमेत वाढ होते. आकर्षक व्याज दराच्या गरजेनरूप विविध ठेव योजना.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कचेरी : चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.

स्थापना : १९३६. महाराष्ट्रात सर्वत्र शाखा शेड्यूल्ड बँक

वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झीक्युटर कंपनी लि.

बँकेच्या या संलग्न संस्थेमार्फत विश्वस्त निधी व व्यवस्थापनाची कामे केली जातात

# सहकारी चळवळ सभासदांची कां रजिस्ट्रारची ?

## कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे परखड विवेचन

अखिल भारतीय सहकारी काँग्रेसचे सहावे अधिवेशन गेल्या एप्रिलमध्ये नवी दिल्ली येथे भरले होते. ह्या अधिवेशनाचा समारोप डॉ. धनंजयराव गाडगीळ ह्यांचे भाषणाने झाला. या भाषणात डॉ. गाडगीळांनी सहकारी चळवळीच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. पण त्याचबरोबर अनेक राज्य सरकारे नवीन सहकारविषयक कायद्यांची अंमलबजावणी करून सहकारी चळवळीचे जे सरकारीकरण करीत आहेत त्याबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली. त्यांच्या भाषणाचा अनुवाद आम्ही येथे देत आहो.

(१)

सहकारी चळवळीचा गेल्या काही वर्षांतील इतिहास पाहिल्यास त्यामध्ये बरीच आशास्थाने दिसतील. यांपैकी अगदी अलिकडील घटना म्हणजे देशातील भू-विकास बँकांनी केलेली उल्लेखनीय प्रगती होय. आपण अपेक्षाही केली नव्हती एवढी आज ह्या भू-विकास बँकांनी प्रगती केली आहे. याबद्दल आपण स्वतःचीच पाठ थोपटून घेतली पाहिजे.

सहकारी चळवळीतील दुसरी उल्लेखनीय घटना म्हणजे साखर कारखान्यासारख्या प्रक्रिया कारखान्यांनी केलेली समाधानकारक आणि नेत्रदीपक प्रगती होय. त्याशिवाय मालाचे साठवण आणि दोन-तीन राज्यांत झालेली समाधानकारक धान्याची एकाधिकार खरेदी ह्यासुद्धा जमेच्या बाजू आहेत. अर्थात ह्याप्रमाणे जशा यशाच्या बाजू आहेत त्याप्रमाणेच अपयशाच्याही बाजू आहेत. काही बाबतीत या अपयशाच्या बाबी एवढ्या मोठ्या आहेत की, त्यांच्या बऱ्याच प्रमाणात सहकारी चळवळीवर विपरित परिणाम झालेला आहे.

### वाढती थकबाकी

वाढती थकबाकी हे सहकारी पतपुरवठ्याचे फार मोठे दुखणे आहे. ह्या दुखण्याबाबत प्रत्येक जण चर्चा करतो, तावातावाने बोलतो पण व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने प्रत्येकाची ह्या मुद्यावर मतभिन्नता आढळते. अर्थात कोणाची कशीही मते असोत. मुख्य मुद्दा शिल्लक राहतो आणि तो म्हणजे ह्या वाढत्या थकबाकीमुळे सहकारी चळवळीवर गेल्या दोन-तीन वर्षांच्या काळात पडलेला फार मोठा बोजा आणि परिणामी सहकारी चळवळीचा घसरत चाललेला दर्जा. आज राष्ट्रीयीकृत बँकांच्या पतपुरवठा कार्यक्रमाची जी गती वाढलेली दिसत आहे त्याच्या मुळाशी हेच कारण आहे. किंवा ज्या क्षेत्रात राष्ट्रीयीकृत बँकांच्या पतपुरवठाविषयक कार्यक्रमांना जोराची गती मिळालेली आहे त्या क्षेत्रात सहकारी चळवळीची प्रगती समाधानकारक झालेली नसेल किंवा सहकारी चळवळ त्या क्षेत्रात मागासलेली राहणेही शक्य आहे. याचाच अर्थ असा की, दहा वर्षांपूर्वी सहकारी चळवळीचा सर्वच राज्यांतून जसा सारखा विकास झाला नव्हता त्या परिस्थितीत आजही फारसा फरक पडलेला दिसत नाही. आपले अपयश म्हणूनच या घटनेकडे पाहावे लागेल. सहकारी चळवळ हे एक विकासाचे साधन असल्याबद्दल दावा करतो. मात्र तो खरा करण्यास सहकारी चळवळीद्वारा देशाच्या फार मोठ्या भागावर प्रत्यक्ष विकास करून दाखविला पाहिजे. याबाबतीत आपल्याला अपयश आल्यास आपण करीत असलेल्या दाव्याला काहीच अर्थ उरणार नाही.

सहकारी चळवळीच्या क्षेत्रातील हे अपयश आणि सहकारबाबतचा सरकारचा दृष्टिकोन आणि लोकमत ह्यांचा विचार केल्यास आपण कठीण परिस्थितीत सापडलो असल्याचे दिसून येईल. सहकारी चळवळीत हितसंबंधांना आळा बसावा म्हणून सरकारने जो कायदा केला आहे आणि ज्याची बहुतेक राज्यांनी अंमलबजावणी केली आहे त्याबाबत आपण नेहमीच चर्चा करतो. अशा तऱ्हेचा कायदा केल्याबद्दल मला दुःख वाटत नाही. परंतु मला सर्वांत जास्त दुःख वाटते ते सरकारच्या सहानुभूतीशून्य धोरणाचे; आपण या बाबतीत काय करू शकू याबाबत सर्वसामान्य जनतेत असलेले अज्ञान ह्या गोष्टीचे.

### चळवळ सहकारी कां रजिस्ट्रारची ?

अशा तऱ्हेचा कायदा निरनिराळ्या राज्यांनी घाईघाईने मंजूर करणे ह्याचा अर्थ कोठे काहीतरी बिघडलेले असावे खास. आपण आपले याबाबतचे म्हणणे सरकारसमोर नीटपणे मांडले नसण्याचीही शक्यता आहे असे मला वाटते. आणि ही गोष्ट उघडच आहे. सहकारी चळवळीतील गेल्या काही वर्षांतील घटनांकडे बारकाईने पाहिल्यास असे आढळून येईल की, निरनिराळी राज्ये कायद्यान्वये किंवा खास वटहुकुमान्वये आपल्या हाती सत्ता घेऊन जुन्या संस्थांची मुस्कटदाबी करीत आहेत. ही एक धक्कादायक अशी घटना आहे. काही काही बाबतीत तर सहकारी चळवळीची एवढी पुच्छप्रगती होत आहे की, सहकारी चळवळ ही रजिस्ट्रारची चळवळ आहे किंवा काय असे वाटू लागते. अनेक राज्यांमधून रजिस्ट्रार्स किंवा अधिकारी महत्त्वाच्या सहकारी संस्थांच्या प्रमुखपदी विराजमान झाले असल्याचे आपण पाहतो. सरकारच्या दृष्टिकोनातील हा फरक ही एक चिंतनीय अशी बाब आहे.

ह्या परिस्थितीचे पृथक्करण केल्यास ही बाब चिंतनीय वाटते खरी पण त्याचबरोबर ह्याबाबतचे अधिक चिंतन केल्यास अशी परिस्थिती का उद्भवली तेही समजू शकेल. ह्यापैकी

माझ्या मते एक कारण असे की, सहकारी कार्यकर्त्यांनी सहकारी नेतृत्व आणि राजकीय नेतृत्व, तसेच सहकार आणि राजकारण यांमधील परस्परसंबंध जाणून घेणे फार आवश्यक आहे. कारण हेच ह्या प्रश्नाचे खरे मर्म आहे.

दुसरी बाब म्हणजे भारतीय सहकारी चळवळीची परिस्थिती अशी आहे की, काही प्रमाणातील सरकारी पाठिंब्याशिवाय तिची प्रगतीच होऊ शकणार नाही. आपल्याला सहकारी व्यवहाराची स्वायत्त व्यवस्था उभारावयाची असेल तर सरकारला प्रथम अशा व्यवस्थेचे राष्ट्रीय महत्त्व कळले पाहिजे. अर्थात ह्यासाठी सहकारी चळवळ ही राष्ट्रीय गरज आहे ही गोष्ट सरकारला कळली पाहिजे. मात्र अशी व्यवस्था यशस्वी होण्यासाठी तिला स्वायत्तता मिळणे जरूर आहे. असे जर झाले तरच आपण योग्य त्या दिशेने प्रगती करू शकू. आज दुर्दैवाने तसे होत नाही.

### बिन-सरकारीकरण आवश्यक

गेली कित्येक वर्षे सहकारी चळवळीचे बिन-सरकारीकरण व्हावे अशी आपण मागणी करीत आलो आहोत. परंतु अनेक राज्यांतून अद्यापि सहकारी चळवळीचे बिन-सरकारीकरण झालेले नाही. काही राज्यांमधून सहकारी संस्थांचा नियंत्रक म्हणून सरकारी अधिकाऱ्याचे पुनरागमन होत आहे. ह्याचे कारण मी आपणास सांगतो. (हे सांगण्याने माझ्या लोकप्रियतेत वाढ होणार नाही याची मला जाणीव आहे.) सहकारी क्षेत्रात आज जे काही घडत आहे ते बव्हंशी सहकारी कार्यकर्त्यांमुळेच घडत आहे. ही वस्तुस्थिती मी अधिक स्पष्ट करतो. स्वातंत्र्य मिळून वीस वर्षांहूनही अधिक कालावधी लोटला असला तरी आजही रजिस्ट्रार किंवा त्याचे खाते हे सहकारी चळवळीवर प्रभुत्व गाजविते ही गोष्ट ठीक नव्हे अशी जाणीव आपल्या लोकनियुक्त सरकारांना होत असेल तर हे कायदे आणि नियम यांमध्ये केव्हाही ही सरकारे बदल घडवून आणू शकतील. ह्या बदल राजकारणी लोकांमुळे घडून येत नाही असाच ह्याचा अर्थ आहे. गेल्या दोन दशकात निरनिराळ्या राज्यांत जी मंत्रिमंडळे अधिकारावर आली त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहकारी कार्यकर्ते हे मंत्रिमंडळाचे सभासद असल्याचे आढळून येईल. म्हणून सहकारी कार्यकर्ते ह्या नात्याने आपण ही जबाबदारी झटकून मोकळे होऊ शकत नाही.

---

**साहित्यसेविकेची अनाथ सेवा** — अमेरिकन सैनिकांमुळे व्हिएटनाममध्ये सुमारे २,००,०००, अपत्यांना अनौरस जन्म प्राप्त झाला आहे. पर्ल बक ह्या सुप्रसिद्ध नोबेल पारितोषिक आणि पुलिट्झर बक्षीस विजेत्या साहित्यिक महिलेने आपल्या फौंडेशनची कचेरी सायगाव येथे उघडून ह्या अनाथ अर्भकांना आर्थिक व इत्तर मदत देण्याचे ठरविले आहे. कोरिया, थायलँड, तैवास, ओकिनावा आणि फिलिपाइन्स येथेही अमेरिकन सैनिकांनी मागे ठेवलेल्या असंख्य अनौरस बालकांच्या संगोपनासाठी आणि शिक्षणासाठी पर्ल बक बाईच्या फौंडेशनने व्यवस्था केली आहे.

### बँकांतील फसवणुकीच्या प्रकारांस आळा रिझर्व्ह बँक तपासणी करणार

राष्ट्रीयीकृत बँकांना फसविण्याचे बरेच प्रकार उघडकीस आल्यामुळे रिझर्व्ह बँकेने ह्या बँकांकडे स्वतःचे अधिकारी पाठवून प्रत्येक फसवणुकीचा तपशीलवार अभ्यास करण्याचे ठरविले आहे. गेल्या मे आणि जूनमध्ये एकूण १ कोटी २० लक्ष रु. ची फसवणूक झाली. सर्वात मोठे प्रकरण स्टेट बँकेच्या नवी दिल्ली शाखेत घडले. त्यात ६० लक्ष रु. ची फसवणूक झाली. युनियन बँकेच्या खार (मुंबई) शाखेच्या एजंटाने व हेड कॅशिअरने २०.३ लक्ष रु. चा अपहार केला. युनियन बँकेच्या महमंद अली रोड (मुंबई) शाखेचे असेच ७·१२ लक्ष रु. चे नुकसान झाले. सेंट्रल बँकेच्या अकोला शाखेला २८·३१ लक्ष रु. ना मुकावे लागले, तर देना बँकेच्या बंगलोर शाखेला १५ लक्ष रु. न फसविण्यात आले. राष्ट्रीयीकृत बँका पैसे कशा गुंतवितात, तारण कसे घेतात, मुख्य कचेरी नियंत्रण कसे ठेवते आणि देखरेख कशी करते, अंतर्गत ऑडिट व तपासणीची व्यवस्था काय आहे शाखा-शाखांतील येण्या-देण्यांचा हिशेब कसा केला जातो, ह्य सर्व बाबींचा विचार रिझर्व्ह बँकेचे अधिकारी करणार आहेत

---

### भारत आणि रशिया ह्यांच्यातील मैत्रीचा करार

भारत आणि रशिया ह्या दोन देशांनी परस्परांत मैत्री सहकार्याचा २० वर्षे मुदतीचा करार केला आहे. त्या अन्वये कोणाही एका देशावर आक्रमण झाल्यास दुसऱ्याने त्या कोणत्या प्रकारे साह्य द्यावयाचे ह्याबद्दल ताबडतोब बोलणी करा वयाची आहेत. ह्या साह्यात लष्करी मदतीचाही अंतर्भाव हो शकेल हे उघडच आहे. बांगला देशाच्या मूलभूत प्रश्नाला बग देऊन त्याला भारत-पाकिस्तान ह्यांमधील प्रश्नाचे स्वरूप देण्य साठी अध्यक्ष याह्याखान प्रयत्न करीत आहेत. युद्धाची भा बोलण्यासही ते कमी करीत नाहीत. बांगला देशाचे निमि करून भारताशी युद्ध करण्याची संधी ते शोधीत होते. चीन पाकिस्तानला उघड पाठिंबा दिलेला होताच. पाकिस्तानमार्फ चीनशी स्नेहाचे संबंध जोडण्याचे धोरण अमेरिकेने स्वीकारता भारत व रशिया ह्यांना एकमेकांच्या अधिक जवळ येणे भाग होते. बांगला देशातील लोकशाहीची गळचेपी होत असता आणि तिचे घोर परिणाम भारतावर होत असताना हिंद सरकार स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. पण ह्या प्रकरणात बड्या राष्ट्रां हितसंबंध लपलेले असल्यामुळे केवळ आपल्याच हिंमती निर्धाराची पावले टाकणे धोक्याचे होते. चीन-पाकिस्तान ह्यांच भारतविरोधी युतीत शब्दाने व कृतीने सामील होउ अमेरिकेने भारताला रशियाचे सहकार्य घेण्यास भाग पाडले अ असेच म्हणावे लागेल.

---

## 'दलित मित्र' या बहुमानाचे २५ मानकरी

महाराष्ट्र शासनाने, मौलिक समाजकार्य करणाऱ्या राज्यातील पुढील २५ समाजसेवकांची 'दलित मित्र' या गौरवपदासाठी निवड केली आहे :—

( १ ) श्रीमती शांताबाई दामोदर साठे, मुंबई., ( २ ) श्री. दादासाहेब सुरताराम वाल्मिकी, मुंबई., ( ३ ) श्री. ह. दा. राऊत, जिल्हा ठाणे., ( ४ ) श्री. महादेव तुकाराम वालावलकर, जिल्हा रत्नागिरी., (५) श्री. एकनाथ तानाजी सौंदाणे .जिल्हा नाशिक., (६) श्री. जनार्दन पोहऱ्या वळवी, जिल्हा धुळे., (७) श्री. धनाजी महारू बोंडे, जिल्हा जळगाव., ( ८ ) श्री. के. रा. वानरोडे, जिल्हा जळगाव.,( ९ ) श्री. नोशेरवान नौरोसजी सथ्या, जिल्हा अहमदनगर., (१०) श्री. प्रभाकर जनार्दन रोहम, जिल्हा अहमदनगर., ( ११ ) डॉ. (श्रीमती) मधुमालती गुणे, जिल्हा पुणे., ( १२ ) श्री. शंकर जानू कारंडे, जिल्हा सातारा., ( १३ ) श्री. शिवराम कृष्णाजी तीरमारे, जिल्हा सांगली., ( १४ ) श्री. तलकराम राघोबा गोसावी, जिल्हा भंडारा., ( १५ ) श्री. नामदेव लक्ष्मण व्हटकर, जिल्हा कोल्हापूर., ( १६ ) श्री. लक्ष्मण वंडू नवले., जिल्हा सोलापूर., ( १७ ) श्रीमती चंद्राताई नरहर फुलारी, जिल्हा परभणी., ( १८ ) श्री. कृष्णराव रावजी पेंडसे, जिल्हा उस्मानाबाद., ( १९ ) श्री. भीमराव सोनबा कोटचाक, जिल्हा नांदेड., ( २० ) श्री. राजाभाऊ केरुजी सुतार, जिल्हा बीड ., ( २१ ) श्री. लक्ष्मणसिंग विंदाप्रसाद यादव, जिल्हा वर्धा., ( २२ ) श्री. पंढरीनाथ सिताराम पाटील, जिल्हा बुलढाणा., ( २३ ) श्री. बाद्दू लालू पटेल, जिल्हा अमरावती., ( २४ ) श्री. रामसिंग भानावत, जिल्हा अकोला आणि ( २५ ) श्रीमती यशोधराबाई भगीरथी वजाज, जिल्हा चंद्रपूर.

---

**ब्रह्मचर्याला कंटाळून धर्मगुरूंचा पदत्याग** — १९६३ ते १९६९ ह्या मुदतीत ८,३०० कॅथॉलिक खिस्ती धर्मगुरूंनी आपल्या पदांचा त्याग केला. ब्रह्मचार्याला कंटाळून पदत्याग करणारे त्यात बहुसंख्य होते १९६३ मध्ये ५६३ धर्मगुरूंनी तर १९६९ मध्ये १,१४२ धर्मगुरूंनी आपल्या पदांचा त्याग केला. सर्वंध जगात ४,३५,००० कॅथॉलिक धर्मगुरू आहेत.

**जपानमध्ये जननाच्या प्रमाणात घट** — जपानमध्ये जननाचे दरहजारी सरासरी प्रमाण २० वर्षांपूर्वी ४·८० आणि दहा वर्षांपूर्वी ३·२० एवढे होते; आता ते २·७२ वर आले आहे. जगातील कमीत कमी जननाचे प्रमाण असलेल्या देशात आता जपानची गणना होते.

**अमेरिकेतील डोकेदुखी** — अमेरिकेतील सुमारे २ कोटी लोकांना वरचेवर डोकेदुखीचा विकार होतो. ॲस्पिरिन आणि डोकेदुखीवरील इतर औषधांसाठी ते लोक दरसाल ३६० कोटी रु. खर्च करतात. डोकेदुखीमुळे मृत्यू ओढवत नसले तरी त्या दुखण्याने फार लोक संतावून जातात.

---


**लढा अजून संपलेला नाही...**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी परकीय सत्तेचे जू झुगारून आपण दारिद्र्य, अज्ञान, रोगराई व सामाजिक विषमता यांच्या विरुद्ध लढा सुरू केला. गेली २४ वर्षे आपण ऐक्य, चिकाटी, दीर्घ परिश्रम यांच्या बळावर नैसर्गिक व राष्ट्रीय आपत्तींना तोंड देऊन ध्येयपूर्तीच्या दिशेने आगेकूच करीत आहोत. याचेच दृश्यफल म्हणजे महाराष्ट्रात:

- अन्नधान्य उत्पादनक्षमता ८१ लाख टनापर्यंत वाढली आहे.
- ३,७८,००० हेक्टर जमीन भूमिहीनांना देण्यात आली.
- ओलितक्षमता १७,२७,००० हेक्टर पर्यंत वाढली.
- कारखान्यांची संख्या ३१,४०० झाली.
- १३,१०० गावांना वीज पोचली आहे.
- शिक्षण संस्थांची संख्या ५०,१६३ वर गेली आहे.
- रस्त्यांची लांबी ६४,२१२ किलोमिटर झाली आहे.
- दवाखाने व इस्पितळांची संख्या १,३९५ वर गेली आहे.
- २१ जिल्ह्यातील तेवीस हजाराहून अधिक खेड्यांत टंचाईच्या निवारणार्थ शासनाने १५ जुलै पर्यंत विविध कामे व तगाईसाठी सुमारे २० कोटी रुपये खर्च केले. सध्या टंचाई निवारण कामावर दर दिवशी सुमारे ११ लाख स्त्रीपुरुष काम करीत आहेत.

तरीही हा लढा अजून संपलेला नाही. समाजातील सर्वात कमजोर घटकाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्याच्या सोयी या किमान गरजा भागवून व सामाजिक न्याय प्रस्थापित करून समृद्ध समाज निर्माण होईपर्यंत हा लढा नेटाने व अधिक तीव्रतेने चालवावयाचा आहे.

आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तन, मन, धन अर्पण करण्याचा निर्धार आपण या पवित्र दिनी पुन्हा करू या.

प्रसिध्दी संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

# ओगले

## प्रभाकर कंदील

◆ अंधाऱ्या रात्री,
◆ वादळी वाऱ्यात,
◆ ओबड-धोबड रस्त्यावर,
◆ खवळलेल्या दर्यावर

**मार्गदर्शक व विश्वसनीय.**

तयार करणार
ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड
ओगलेवाडी (जि. सातारा)



# THE BELGAUM BANK LIMITED

**Estd. 1930**

SCHEDULED BANK


*Regd. Office* : **659–60, Raviwar Peth, Belgaum**

**Working Funds : Over Rs. 7 Crores**

**Share Capital &**
**Reserves : Over Rs. 17 Lacs**

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

**S. Y. KAMAT** — *General Manager.*
**K. B. KIRTIKAR** — *Chairman.*



**इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.**

कारखानदार—

# न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली (महाराष्ट्र)

फोन : २३२ तार : Vijayplow


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)